आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१० फेब्रुवारी २०२६ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- लोकसभेतला गदारोळ आटोक्यात, अर्थसंकल्पावर चर्चा सुरू

- विरोधी पक्षाच्या ११८ खासदारांकडून सभापती ओम बिर्ला यांच्याविरोधात अविश्वास प्रस्ताव दाखल

- राज्य सरकार एक एप्रिलपासून माझं गाव, आरोग्य संपन्न गाव अभियान राबवणार, प्रलंबित सिंचन प्रकल्पांसाठी कर्ज घेऊन ८ लाख हेक्टर जमिनीला सिंचनाखाली आणणार

**आणि**

- लहान मुलं बेपत्ता होण्याच्या प्रकरणांचा काटेकोर तपास करण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या सूचना

<><><><>

गेल्या आठवड्यापासून लोकसभेत सुरू असलेला गदारोळ आज दुपारी थांबला. विरोधी पक्षाच्या गदारोळांमुळं दुपारी २ पर्यंत कामकाज तहकूब झालं होतं. मात्र दोन वाजेनंतर केंद्रीय अर्थसंकल्पावर चर्चा सुरू झाली. लोकसभेत चर्चेला सुरुवात करताना काँग्रेसचे खासदार शशी थरूर यांनी अर्थसंकल्पावर जोरदार टीका केली. या अर्थसंकल्पात वैयक्तिक करदात्यांवरचा बोजा वाढवला असून कंपन्यांना सूट दिली. बेरोजगारी, वाढता दैनंदिन खर्च आणि असमानता यासारख्या गोष्टींवर अर्थसंकल्पात दुर्लक्ष झाल्याचं ते म्हणाले.

या अर्थसंकल्पातून सरकारची जनतेप्रतीची वचनबद्धता दिसून येते असं भाजपाच्या अपराजिता सारंगी आपल्या भाषणात म्हणाल्या. यावेळी त्यांनी विविध देशांशी भारताने केलेल्या मुक्त व्यापार कराराचा उल्लेख केला.

समाजवादी पक्षाचे नेते अखिलेश यादव यांनी हा अर्थसंकल्प दिशाहीन असल्याची टीका केली. आर्थिक आणि सामाजिक विषमतेवर या अर्थसंकल्पात काहीच तोडगा काढलेला नाही असं यादव म्हणाले. तर पश्चिम बंगालला केंद्राकडून येणं बाकी असणाऱ्या एक लाख ९० हजार कोटी रुपयांचा मुद्दा तृणमूल काँग्रेसचे अभिषेक बॅनर्जी यांनी उपस्थित केला.

सार्वजनिक क्षेत्रातल्या बँका आणि वीमा कंपन्यांना सरकारनं कमकुवत केल्याचा आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार अनिल देसाई म्हणाले.

राज्यसभेतही आज केंद्रीय अर्थसंकल्पावर चर्चेला पुन्हा सुरूवात झाली. जागतिक अस्थिरतेच्या या काळात भारत एकटाच स्थिरपणे उभा असल्याचं शिवसेना खासदार मिलिंद देवरा यांनी म्हटलं आहे. तर हा अर्थसंकल्प गरीबविरोधी असल्याची टीका द्रमुक खासदार कनिमोळी यांनी केली. भाजपा खासदार सुरेंद्र सिंह नागर यांनीही अर्थसंकल्पावर आपले विचार मांडले. या अर्थसंकल्पात महिला आणि बालविकासासाठी २८ हजार कोटी रुपये तरतूद केली असली तरी बालकांसाठी केलेल्या खर्चात मोठी कपात केल्याचं राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार  फौजिया खान यांनी निदर्शनास आणून दिलं. हा खर्च जीडीपीच्या केवळ एक टक्के आहे, असं त्या म्हणाल्या. ही चर्चा उद्याही चालू राहील.

<><><><><>

लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांच्यावरचा अविश्वास दर्शक ठराव विरोधी पक्षांनी आज लोकसभेच्या महासचिवांना सादर केला. काँग्रेस, द्रमुक, समाजवादी पक्ष, राष्ट्रीय जनता दल, डावे पक्षाच्या ११८ सदस्यांनी याला पाठिंबा दिला आहे. या प्रस्तावाची पडताळणी करुन नियमाप्रमाणे कारवाई केली जाईल, असं लोकसभा सचिवालयानं कळवलं आहे. या अविश्वास दर्शक ठरावावर निर्णय होणार नाही तोपर्यंत लोकसभेच्या कामकाजात सहभागी न होण्याचा निर्णय सभापती ओम बिर्ला यांनी घेतला आहे.

<><><><><>

राज्यात ‘माझं गाव, आरोग्य संपन्न गाव अभियान’ राबविण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. मंत्रालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत या निर्णयाला सरकारनं मान्यता दिली. १ एप्रिलपासून हे अभियान राबवलं जाईल.

राज्यातल्या ८ लाख हेक्टर जमिनीला सिंचनाखाली आणण्यासाठी राज्य सरकार नाबार्डकडून आणखी साडे ७ हजार कोटी रुपयांचं कर्ज घेणार आहे. अपूर्ण असलेले ५७ सिंचन प्रकल्प, कालवे आणि पूर्ण झालेल्या प्रकल्पांच्या वितरण प्रणालीची कामं यातून पूर्ण केली जाणार आहेत.

नवी मुंबईच्या शेजारी होणाऱ्या तिसऱ्या मुंबईतल्या सर्व विकास प्रकल्पांचं भूसंपादन आणि भूवाटपाच्या सर्वसमावेशक धोरणाला राज्य मंत्रीमंडळानं आज मंजुरी दिली. पुरंदर विमानतळाच्या भूसंपादनासाठी सहा हजार कोटींचं कर्ज घ्यायला सरकारनं आज मान्यता दिली. ९६ टक्के लोकांनी जमीन अधिग्रहणासाठी तयारी दाखवली असल्यानं हे अधिग्रहण जूनच्या पहिल्या आठवड्यापर्यंत पूर्ण होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी व्यक्त केला.

<><><><>

राज्य विधिमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन येत्या २३ तारखेपासून सुरू होणार आहे. या अधिवेशनाचा कालावधी २५ मार्चपर्यंत असून ६ मार्च रोजी राज्याचा अर्थसंकल्प सादर करण्यात येईल. विधानसभा आणि विधानपरिषदेच्या आज झालेल्या कामकाज सल्लागार समिती बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

<><><><>

देशाच्या विविध भागातून लहान मुलं बेपत्ता होण्यामागे देशव्यापी जाळं आहे की राज्यनिहाय गट कार्यरत आहेत, हे तपासण्याच्या सूचना सर्वोच्च न्यायालयानं आज केंद्र सरकारला दिल्या. या घटनांमागे काही ठरविक  पद्धत आहे का, हे तपासण्याची गरजही न्यायमूर्ती बी व्ही नागरत्न आणि उज्जल भुयान यांच्या पीठानं अधोरेखित केली. या घटनांसाठी जबाबदार असलेल्या व्यक्तींना शोधण्यासाठी सुटका झालेल्या मुलांची मुलाखत घ्यावी अशी सूचनाही न्यायालयानं दिली आहे. देशभरात बेपत्ता होणाऱ्या मुलांच्या वाढत्या संख्येबाबत चिंता व्यक्त करणाऱ्या एका जनहित याचिकेवरच्या सुनावणी दरम्यान न्यायालयानं या सूचना दिल्या.

<><><><>

छत्तीसगडमधल्या मुख्यमंत्री कन्या विवाह योजनेच्या अंतर्गत आज राज्याच्या विविध भागात एकूण सहा हजार विवाह झाले. या योजनेचा प्रमुख सोहळा मुख्यमंत्री विष्णू देव साय यांच्या उपस्थितीत रायपूरच्या विज्ञान महाविद्यालयाच्या मैदानावर पार पडला. यावेळी तेराशे विवाह झाले. या सोहळ्यात सहभागी जोडप्यांना राज्य सरकार ३५ हजार रुपयांनी आर्थिक मदत देते.

<><><><>

मणिपूरच्या उखरुल जिल्ह्यात काल मध्यरात्रीपासून पाच दिवसांसाठी इंटरनेट सेवा बंद करण्यात आली आहे. गेल्या शनिवारी उसळलेल्या जातीय दंगलीनंतर जिल्ह्यातल्या काही भागात तणाव निर्माण झाला होता. त्यामुळे राज्यातल्या गृह विभागाने जिल्ह्यात मोबाईल आणि इंटरनेट सेवा काही काळापुरत्या स्थगित केल्या आहेत.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या निमंत्रणावरून फ्रान्सचे अध्यक्ष इम्यॅन्युएल मॅक्रॉन येत्या १७ तारखेपासून तीन दिवसांच्या भारत दौऱ्यावर येणार आहेत. येत्या १९ फेब्रुवारीला नवी दिल्लीत होणाऱ्या एआय इम्पॅक्ट समिटमध्ये ते सहभागी होतील. या दौऱ्यात २०४७ पर्यंतच्या दोन्ही देशांमधल्या सहकार्याच्या आराखड्यावर मोदी यांच्याशी ते चर्चा करणार आहेत, असं परराष्ट्र मंत्रालयाने आपल्या निवेदनात म्हटलं आहे. दोन्ही देशांमध्ये यंदा होणाऱ्या भारत-फ्रान्स नवोन्मेष वर्षाचं दोन्ही नेत्यांच्या हस्ते मुंबईत उद्घाटन होईल.

<><><><>

नेपाळमध्ये आज प्रवासी बस नदीत कोसळून झालेल्या अपघातात १२ जणांचा मृत्यू झाला तर आठ जण जखमी झाले आहेत. ही बस काठमांडू हून ओखलढुंगा इथे जात होती. मृतांपैकी १० जणांची ओळख पटली असून जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

<><><><>

टी-२० क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या आजच्या पहिल्या सामन्यात नेदरलँडनं नामिबियाचा ७ गडी राखून पराभव केला. नामिबियानं प्रथम फलंदाजी करतांना २० षटकांत ८ गडी बाद १५६ धावा केल्या. नेदरलँडनं ही धावसंख्या केवळ १८ षटकात ३ गड्याच्या मोबदल्यात पार करत सहज विजय मिळवला.

न्यूझिलंड आणि संयुक्त अरब अमिरातीमध्ये चेन्नईच्या चिदंबरम स्टेडियमवर झालेल्या सामन्यात न्यूझिलंडनं संयुक्त अरब अमिरातीचा सहज पराभव केला. संयुक्त अरब अमिरातीनं प्रथम फलंदाजी करताना २० षटकात १७३ धावा केल्या. न्यूझिलंडनं केवळ १५ षटकातच १७५ धावा करत विजय मिळवला. कोलंबो इथला आजच्या दिवसाचा तिसरा सामना सुरु झाला असून अमेरिकेनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला आहे.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा पाकिस्तानच्या १० षटकात दोन बाद ८५ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

आशियाई नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धेत आज भारतीय नेमबाजांनी एकाच प्रकारात दोन पदकं पटकावली. महिलांच्या ५० मीटर एअर रायफल थ्री पोझिशन प्रकारात भारताच्या आकृती दहिया हिने रौप्य पदक तर अंजुम मौदगिल हिने कास्य पदक पटकावलं. याच प्रकाराच्या सांघिक गटात आकृती आणि अंजुम यांनी आशी चौकसी हिच्या साथीने रौप्य पदकाची कमाई केली.

**<><><><><>**

किनारी सुरक्षा जागरुकता, राष्ट्रीय एकात्मता मजबूत करण्याच्या उद्देशाने केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाकडून कोस्टल सायक्लोथॉनचं आयोजन करण्यात आलं आहे. दमण इथून आज सकाळी पाच वाजता या सायक्लोथॉनला सुरुवात झाली आणि ही सायकल रॅली सकाळी डहाणू समुद्र किनाऱ्यावर पोहोचली. या रॅलीत दलाचे १३० अधिकारी आणि कर्मचारी सहभागी झाले आहेत.  ही सायक्लोथॉन २५  दिवसांत ६ हजार ५५३ किलोमीटरचा प्रवास करत भारताचा संपूर्ण समुद्रकिनारा व्यापणार आहे.

**//<><><><><>//**